१३२

**वाचा :-** १. संचालनालयाचे पत्र क्र.स्था. १८/ब/जि.प./पं.स/ले.प./सन-२०१४-१५/एए १/१२८६, दि. ०४/०८/२०१५.

२. ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्रमांक : चौविआ-२०१५ /प्र.क्र.२६/वित्त-४ , दि. १६/०७/२०१५.

३. भारत सरकार, वित्त विभागाचे पत्र क्र. १३(३२), FFC/FCD/२०१५-१६, दि. ०८/१०/२०१५.

---

क्र. स्था.१८/ब/ग्रामपंचायत लेखापरीक्षण/अहवाल/एए२/ १६६५

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य, कोंकण भवन, ६ वा माळा,**
**नवी मुंबई ४००६१४**
**दिनांक :-** 26 OCT 2015

# परिपत्रक

**विषय :- ग्रामपंचायतीचे सन २००७-०८ ते २०१४-१५ पर्यंतचे लेखापरीक्षण माहे मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करण्याबाबत.**

संचालनालयाने उपरोक्त वाचा क्र. १ अन्वये जिल्हा परिषद व पंचायत समितीचे सन २०१४-१५ चे लेखापरीक्षण हाती घेण्यात यावे व लेखापरीक्षकांच्या उपलब्धतेनुसार प्रलंबित ग्रामपंचायत घटकांचे लेखापरीक्षण समांतर सुरु ठेवणेबाबत सूचित केले आहे.

वाचा क्र. २ च्या ग्रामविकास विभागाच्या शासननिर्णयाद्वारे १४ व्या केंद्रीय वित्तीय आयोगांतर्गत केंद्र सरकारकडून राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी प्राप्त होणारा निधी हा केवळ ग्रामपंचायत स्तरासाठीच उपलब्ध करावयाचा असून वाचा क्र. ३ मधील केंद्र शासन, वित्त विभागाने सदर निधीचे वितरण, विनियोगाबाबतची मार्गदर्शक तत्त्वे व वितरीत निधीमधून करावयाची कामे याबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित केल्या आहेत. सदर मार्गदर्शक सुचनांमधील अनुक्रमांक १३ नुसार कार्यक्रम निधी (Performance Grant) प्राप्त करुन घेणेसाठी ग्रामपंचायतीने शासनाकडे ज्या वर्षासाठी अनुदानाची मागणी करावयाची आहे, त्या वर्षापूर्वीच्या दोन वर्षांचे लेखापरीक्षण झालेले लेखे शासनास सादर करणे आवश्यक आहे.

उपरोक्त मार्गदर्शक सूचनेचा विचार करता राज्यातील सर्व ग्रामपंचायतींना १४ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत निधी प्राप्त होण्यासाठी ग्रामपंचायतींचे सन २०१४-१५ पर्यंतचे लेखापरीक्षण पुर्ण करुन माहे मार्च २०१६ पर्यंत अहवाल निर्गमित होणे आवश्यक आहे.

यास्तव राज्यातील सर्व ग्रामपंचायतीचे सन २००७-०८ ते २०१४-१५ या कालावधीतील लेखापरीक्षण तात्काळ हाती घेण्यात यावे , यासाठी जिल्हा कार्यालयाने त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या लेखापरीक्षकांपैकी ५० टक्के लेखापरीक्षकांच्या सेवा जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखापरीक्षणासाठी व उर्वरित ५० टक्के लेखापरीक्षकांची सेवा ग्रामपंचायत लेखापरीक्षणासाठी चक्रीय पद्धतोने वापरुन माहे मार्च २०१६ पर्यंत ग्रामपंचायत लेखापरीक्षण पूर्ण करावे.

राज्यातील सर्व ग्रामपंचायतीचे सन २००७-०८ ते २०१४-१५ या कालावधीतील लेखापरीक्षण माहे मार्च २०१६ पर्यंत पूर्ण करण्यासाठी सहाय्यक संचालक(जिल्हा) यांच्या स्तरावरुन जिल्हावार ग्रामपंचायतींच्या लेखापरीक्षणाचे नियोजन करुन नियोजन कार्यक्रम सहसंचालक कार्यालयामार्फत दि. ३१/१०/२०१५ पर्यंत संचालनालयास सादर करावा.

तसेच ग्रामपंचायत लेखापरीक्षणाचा जिल्हावार मासिक प्रगती अहवाल विभागीय सहसंचालक यांनी दर महा ५ तारखेपर्यंत संचालनालयास सादर करावा .

(का.मा.विधाते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महराष्ट्र राज्य.

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव :-

१. सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोंकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

२. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सर्व

३. मुख्य कार्यकारी अधिकारी , सर्व जिल्हा परिषद यांना कळविण्यात येते की, आपल्या अधिनस्त ग्रामपंचायतींना लेखापरीक्षणासाठी अभिलेखे उपलब्ध करुन देण्यास आपल्या स्तरावरुन आदेश देण्यात यावेत.

४. कार्यालयीन नस्ती.

surekha hall lenovo d ahwal vp circular